## दिनांक २०/०४/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ५) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/ पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | फ्रेजरपुरा | २६५/२२ कलम २२४ भादवी | जेल मधुन पळुन जाणे | -- | व्यकंय्यपुरा चिलम छावनी अमरावती | दी १९/०४/२०२२ चे १२/३० वा | दी १९/०४/२०२२ चे १७/३९ वा. | भारत म. भोसले अधीक्षक अमरावती कारागूह तर्फे मिलींद प्रकाश बनसोड वय ५७ वर्ष धंदा नोकरी (वरीष्ट तुरुंग अधिकारी) | ज्ञानेश्वर प्रल्हाद सोनोने वय४४ वर्ष बंदी क्र सी ६४ रा साखरखेडा डाहेजन सिंदखेडराजा जि बुलढाणा ह मु मध्यवती कारागूह अमरावती आरोपी अटक नाही | भेट देणारे अधिकारी - व तपास अधिकारी - एच सी १२१९ सूनिल मेटकर दी १९.०४.२०२२ चे १८.०० वा | हकीकत अशा प्रक्कारे आह की नमुद घटना ता वेळी व ठीकाणी फिर्यादी नामे यांनी पो स्टे ला लेखी रिपोर्ट दिला की त्याचे कारागुह मधील शिक्षा कैदी क्रं सि-६४ नामे ज्ञानेश्वर प्रल्हाद सोनोने वय ४४ वर्ष हा कुले कारागूहामध्ये ढोरे चारण्याचे देखरेख करीता नेमलेला असुन हा नमुद घटना ता वेळी व ठीकाणी सदर बंदी हा शौचालय टावर जवळील बाथरुममधे गेला असता महीला रक्षक दीपीका विश्वासराव वानखडे हीने नमुद बंदीस हटकले असता तो महीला रक्षक सोबत हुज्जत करून जेल परीसर सोडुन चिलम छावनी कडे पळुन गेला त्याचा इतर रक्षकांनी पाठलाग करुन त्यास पकडण्यात येवुन कारागूहात टाकण्यात आले. अशा लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला गुन्हा लागलीच दाखलके |
| २. | बडनेरा | ३२७/२०२२ कलम ३२४ भा. दं. वि. | मारहाण करून दुखापत. | - | शिवाजी चौक, आठवडी बाजार, बडनेरा | दि. १८.०४.२०२२ चे १९.०० वा. | दि. १९.०४.२०२२ चे १३.३९ वा | किशोर बबनराव जगदळे, वय ४१ वर्षे, रा. लढ्ढा प्लॉंट, बडनेरा. | विजय उर्फ पिंटु कदम, वय ३६ वर्षे, रा. लढ्ढा प्लॉंट, बडनेरा. (अटक नाही) | ASI अहेमद अली ब.नं.७८४ पोस्टे बडनेरा अमरावती शहर मो.क्र.७०५७८२०४०५ वेळ - १३.३० वा ते | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे सोमवार बाजारात बाजार करण्याच्या उद्देशाने गेले असता आरोपी हा सुध्दा त्याच्या पत्नीसह बाजारात होता. आरोपीने त्याच्या पत्नीला पाहण्याच्या संशयावरून फिर्यादीसोबत वाद करून त्याच्या हातात असलेल्या धातुच्या कळयाने फिर्यादीच्या तोंडावर, नाकावर मारहाण करून जखमी केले. मारहाणीत फिर्यादीचा अर्धवट दात तुटला. अशा फिर्यादीच्या जबानी |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | १४.०० वा. | रिपोर्टवरून व मेडीकल सर्टीफिकेटवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.<br>विलंबाचे कारण - फिर्यादीकडुन<br>दाखल अधिकारी - ASI अहेमद अली ब.नं.७८४ पोस्टे बडनेरा अमरावती शहर मो.क्र.७०५७८२०४०५ |
| ३. | पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | ४५५/२०२२ कलम १४३, १८८ भादवि | आदेशाचे उल्लंघन करणे | ----- | जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती | दि १९.४.२०२२ चे १४.०० वा | दि १९.०४.२०२२ चे २२.१९ वा | सरतर्फे वपोनि आसाराम हिरूभाऊ चोरमले पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | १- अनिल बोंडे<br>२-एक महीला<br>३- शिवराय कुलकर्णी<br>४- प्रशांत शेगाकार<br>५-प्रविण तायडे<br>६-किरण पातुरकर<br>७-प्रमोदसिंग गडरेल<br>८-ललीत समदुरकर<br>९-मंगेश खोंडे<br>१० दिपक खताडे<br>११- तुषार भारतीय<br>१२- जयंत डेहनकर<br>१३ रविंद्र खांडेकर<br>१४- सुधिर रसे रा पथ्रोट<br>१५-वेतन | वपोनि आसाराम हिरूभाऊ चोरमले सोबत पोस्टॉफ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर दि १९.४.२०२२ चे १४.०० वा ते १५.०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील भारतील जनता पार्टीचे नेते कार्यकर्ते यांनी अचलपुर परतवाडा येथील जातीय तणावमध्ये हिंदु जनतेमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी भेट देणा-या जिल्हा भाजपाच्या पदाधिका-यांना अटक करण्यात आली तसेच कार्यकत्यांची धरपकड करण्यात येत आहे प्रशासनाच्या या कृतीचा निषेध करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे एकत्र जमा होवुन महाविकास आघाडीचे विरोधात घोषणाबाजी केली मा जिल्हाधिकारी यांचे दालनाचे दरवाज्यावर मागणीचे निवेदन चिटकविण्यात आले नंतर पोलीस अधिक्षक कार्यालय येथे जावुन मा पोलीस उपअधिक्षक गृह श्री सुर्यवंशी यांना अचलपुर येथे तालीबानी प्रवृतीच्या हिंसक जमावाने सामाजिक वातावरण खराब केल्यानंतर राज्यसरकारच्या आदेशाने पोलीस प्रशासनाकडुन पक्षपाती कारवाया करण्यात येवु नये या मागणीचे निवेदन देण्यात आले १४.०० वा सर्व कार्यकर्ते पोलीस अधिक्षक कार्यालय येथुन निघुन गेले.<br>सध्या अमरावती पोलीस आयुक्तालय परीसरात मा पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचे आदेश क्र पोआअ/विशा/रामनवमी/कलम १४४/१२१४ /२०२२ दि ३०.०३.२०२२ कलम १४४-१,२,३ सीआपीसी अन्वये मनाई आदेश पारीत करण्यात आला आहे तसेच मा पोलीस |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | गावंडे<br>१६- अधिक १०० ते १२५ कार्यकर्ते<br>आरोपी अटक नाही | | उपायुक्त मुख्यालय अमरावती शहर यांचा पोआअ विशा/कावसु/१५००/२०२२ दि १५.०४.२०२२ नुसार कलम ३७-१, ३ मपोका ची अधिसुचना व आदेश निर्गमित करण्यात आला आहे आंदोलनकत्यांनी वरील दोन्ही नमुद आदेशाचे उल्लंघन करून एकत्र जमा होवुन घोषणाबाजी करून विनापरवाना निदर्शने आंदोलन केल्याने नमुद गुन्हा नोंद करण्यात आला. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. लागलीच दाखल<br>दाखल अधिकारी पोउपनि संजयसिंग चौव्हाण<br>तपासी अधिकारी पोउपनि आर आर जढाळे पोस्टे गाडगेनगर अमरावती शहर |
| ४. | राजापेठ | २८४/२०२२ कलम ३७९ भादवी | चोरी | पाण्याचे मिटर कि.अं. १०००रु | पवननगर क्र.१ ,गोपाल नगर अमरावती | दि.१८/०४/२२ चे १९/०० वा.ते दि.१९/०४/२२ चे ०७/०० वा दरम्यान | दि.१९/०४/२०२२ चे १७/३० वा | अशोक सुंदरलाल शर्मा वय ५२ वर्ष रा. पवननगर क्र.१ ,गोपालनगर अमरावती | अज्ञात<br><br>अटक --- नाही | मपोनी पाटील मॅडम ,HC निलेश वानखडे ब.न.८८० पोस्टे राजापेठ | हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे राहत्या घराचे आवारात असलेले पाण्याचे मिटर कि.अं. १००० रु चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>तपासीअधीकारी --- पोहेका बांडे ब.न. १७५७ पोस्टे राजापेठ मो.न. ७०२०९९६१४१ |
| ५. | राजापेठ | २८५/२०२२ कलम ३९२,३४ भादवी | जबरी चोरी | नगदी ३९०० रु | भानखेडा रोड अमरावती | दि.१९/०४/२०२२ चे १५/३० वा. चे दरम्यान | दि.१९/०४/२०२२ चे १८/५७ वा. | वृषभ नागोराव पाटील वय २३ वर्ष रा. उत्तखेड ता.जि. अमरावती | गाडी क्र. १ FZ मोटरसायकल MH ३१CW ७४१६<br>२) होन्डा शाईन क्र.MH २७ | मपोनी पाटील मॅडम HC निलेश वानखडे ब.न.८८० पोस्टे राजापेठ | हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी तसेच अमिनाश कावरे हे आपआपल्या वाहनाने रोडने जात असतांना यातील नमुद वाहन क्र.१ व २ वरील चार इसमांनी फिर्यादीस अडवुन त्यांचे पॅन्ट चे खिश्यातील ३५०० रु रोख रक्काम तसेच कावरे यांते पॅन्ट चे खिश्यातील ४०० रु जबरीने हिसकावुन चोरी केले.अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन सदर चा |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | DB ६११६चे मालक<br>अटक ---२ आरोपी अटक व एक आरोपी विधीसंघर्षीत बालक आहे | | गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>दाखल अधीकारी -- HC निलेश वानखडे ब.न.८८०पोस्टे राजापेठ<br>तपासीअधीकारी ---- पोउपनी गजानन काठेवाडे सा. पोस्टे राजापेठ |
| ६. | राजापेठ | २८६/२०२२ कलम ३२४,५०४ ,३४ भादवी | दुखापत करणे | -- | नवदुर्गा विहार, कुभांरवाडा गोपालनगर अमरावती | दि.१९/०४/२२ चे २०/०० वा. दरम्यान | दि. १९/०४/२२ चे २३/२७ वा. | केशव श्रीराम खलेलकर वय ६२ वर्ष रा. नवदुर्गा विहार, कुभांरवाडा गोपालनगर अमरावती | १)प्रवीण बंड २)ज्ञानेश्वर उगले ३)धनराज ठाकरे तिन्ही रा. नवदुर्गा विहार, कुभांरवाडा गोपालनगर अमरावती<br><br>अटक --- नाही | मपोनी पाटील मँडम , PSI किसन मापारी सा. पोस्टे राजापेठ अमरावती मो.न. ९४२००२५८६५ | हकीकत अश्या प्रकारे आहे की, फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यातील रहीवासी असुन या अगोदर त्यांचे भांडण होते .नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घरी हजर असतांना यातील आरोपी हे फि.चे घरा समोर येवुन पाणी पिण्याकरीता मागीतले फि.ने पाणी पिण्यास दिले त्यावेळेस आरोपी क्र.१ याने फिर्यादीस प्लॉट विकता का असे म्हटले असता फि.ने मनाई केली असल्याने आरोपी क्र.१ ने शिवीगाळ केली ,आरोपी क्र.२ व ३ यानी लाथाबुक्कानी मारहान केली.तसेच आरोपी क्र.४ ने मागुन कवट्यात पकळुन ठेवले .आरोपी क्र.१ ने फिर्यादी चे अंगणात पडलेली लोखंडी सलाख फि.चे डोक्यावर मारुन जख्मी करुन रक्तबंबाळ केले.तसेच आरोपी क्र.१ते ४ निघुन गेल्याने फि. पोस्टे ला रिपोर्ट देण्यास आले.अश्या फि.चे मेडी सर्टी व जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>दाखल अधीकारी - PSI किसन मापारी सा. पोस्टे राजापेठ अमरावती मो.न. ९४२००२५८६५<br>तपासी अधीकारी --- पोहेका बांडे ब.न. १७५७ पोस्टे राजापेठ अम. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | पोस्टे सिटी कोतवाली | २०२/ २०२२ कलम ३७९ भादवी | मोट ा र सायकल चोरी | हिरो होंडा स्पेलंडर प्लस एम एच २७ डब्लु ३०९२ चेटिस क्र ०५G१६C० ०२९१ इंजिन क्र ०५G१५M ००२२८ किंमती ८००० | सासरवाडी हाँटेलजवळ श्रीकृषणपेठ अमरावती | दि. १७/०४/ ०२०२२ चे २१.३० वा ते२२.०० वा | दि. १९.०४/ २०२२ चे २१.०४ वा | हर्षल मनोहरराव इंगोले वय ४० वर्ष रा. विद्यावैभव कालनी सेगाव रोड अमरावती | अज्ञात | सपोनि सोनोने पोस्टे सिटी कोतवाली दि . १९.०४.२०२ २ चे २१.१५.०० वा ते २१.३५ वा | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी हे वर नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी त्यांची हिरो होंडा कंपनीची स्पेलंडर प्लस मोटार सायकल एम एच २७ डब्लु ३०९२ हि सासरवाडी हाँटेल जवळ श्रीकृष्णपेठ इर्विन चौक अमरावती येथे फुटपाथवर पार्क करून त्यांचा लहान भाउ रूषीकेश मनोहरराव इंगोले यांच्यासह सासरवाडी हांटेलमध्ये जेवण करण्याकरीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे संमतीशिवाय वरील वर्णानाची व किंमतीची गाडी चोरून नेली आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. विलंबाची कारणे - फिर्यादीकडुन<br>तपासी अधिक ारी - सपोनि सुमेध सोनोने पोस्टे सिटी कोतवाली |

## दिनांक २०/०४/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग ६) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला/ मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | बडनेरा | ३२५/२२ कलम २८३ भा.दं.वि. | वाहतुकीस व जिवीतास धोका | - | जयहिंद चौक, नवी वस्ती, बडनेरा | दि. १९.०४.२ २ चे ११.०५ वा. | दि. १९.०४.२ २ चे १२.४९ वा. | सरतर्फे ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.सटे. बडनेरा, अम. शहर. मो.नं. ८८८८८०५ ७७१५ | योगेश खुशालराव भारती, वय २८ वर्षे, रा. वडुरा, बडनेरा. (सजपत्रावर रिहा) | ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.सटे. बडनेरा, अम. शहर. मो.नं. वेळ - ११.०५ वा ते ११.३० वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ऑटो क्र. MH-२७-BW-५४२९ हा सार्वजनिक रस्त्यावर नागरिकांना व वाहतुकीस धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभा करून ठेवलेला मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखळ करून तपासात घेतला. विलंबाचे कारण - लागलीच<br>तपास अधिकारी - ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.सटे. बडनेरा, अम. शहर. मो.नं. ८८८८८०५७७१५ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | बडनेरा | ३२६/२२ कलम २८३ भा.दं.वि. | वाहतुकीस व जिवीतास धोका | -- | रेल्वे ओव्हर ब्रिज, नवी वस्ती, बडनेरा | दि. १९.०४.२२ चे ११.४० वा. | दि. १९.०४.२२ चे १३.०१ वा. | सरतर्फे ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. मो.नं. ८८८८८०५७७१५ | श्रीकृष्ण पुंडलिकराव शिरकरे, वय ४३ वर्षे, रा. फुलआमला, ता. नांदगाव खंडेश्वर, अमरावती. (सजपत्रावर रिहा) | ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. मो.नं. वेळ - ११.४० वा ते १२.१० वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ऑटो क्र. MH-२७-BW-१३०६ हा सार्वजनिक रस्त्यावर नागरिकांना व वाहतुकीस धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभा करून ठेवलेला मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. विलंबाचे कारण - लागलीच<br>तपास अधिकारी - ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. मो.नं. ८८८८८०५७७१५ |

## दिनांक २०/०४/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (जुगार) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | पोस्टे गाडगे नगर | ४५६/२०२२ कलम १२-अ मजुका | जुगार खेळणे | नगदी ७१५/- रू चा जुगार वरली मटका साहित्य माल व साहित्य | भिमनगर अमरावती | दि १९.०४.२०२२ चे २०.४५ वा | दि १९.०४.२०२२ चे २३.०२ वा | सरतर्फे पोहेकॉ निळकंठ गवई बनं १००५ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | १- अजय मोहनराव मोरे वय ३८ वर्ष रा बेनोडा झोपडपटटी अम<br>२- चंद्रकुमार मारोतराव गोहत्रे वय ४८ वर्ष रा गाडगे नगर उमप यांचे घरी भाडयाने अम<br>३- अमर विजय स्वर्गे फरार रा भिमनगर अमरावती<br>आरोपी १ व २ समजपत्रावर रिहा आरोपी ३ फरार | उपनि संजयसिह चौव्हाण सोबत पोहेकॉ निळकंठ गवई सोबत पोस्टॉफ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर दि १९.०४.२०२२ चे २३.०२ वा | हकीकत अशा प्रकारे अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना मिळालेल्या गुप्त बातमी माहितीच्या आधारे वरली मटक्याचे १ ते १० आकडे जुगार चालु असल्याचे ठिकाणी जुगार रेड केली असता वरली जुगार खेळणारे दोन्ही खेळविणारे दोन्ही इसम हे जागीच मिळुन आले वरून त्यांच्या ताब्यातुन एकुण नगदी ७१५/- रू चा जुगार वरली मटका साहित्य माल व साहित्य मिळुन आल्याने घटनास्थळ जप्तीपंचनामा प्रमाणे जप्त करण्यात आले तसेच वरलीचा जुगार धंदाबाबत विचारणा केली असता सदरचा धंदा अमर स्वर्गे यांचा असल्याचा सांगितले अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला लागलीच दाखल |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | दाखल अधिकारी पोउपनि संजयसिह चौव्हाण पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर |

## दिनांक २०/०४/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल प्रोव्हीशन) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | बडनेरा | ३२८/२०२२ कलम ६५(ई) मदाका | अवैद्य दारू विक्री | ०९ नग देशी दारू बॉबी संत्रा बॉटल कि.५४०/रू | ग्राम निंभा | दि. १९/०४/२०२२ चे १८/४५ वा. | दि. १९/०४/२०२२ चे २१/०७ वा. | सरतर्फे ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.सटे. बडनेरा, मो.नं. ८८८८८० | संदीप देवराव चोधरी वय ४२ वर्ष रा. ग्राम निभा समजपत्र वर रिहा करण्यात आला | ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.सटे. बडनेरा, अम. शहर. | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व टिकाणी यातील नमुद आरोपी याचेवर प्रोव्हीशन रेड केली असता त्याचे ताब्यातुन ०९ नग देशी दारू बॉबी संत्रा बॉटल कि.५४०/रू चा माल मिळुन आल्याने सदर गुन्हा दाकल करून तपासात् घेतला |

## दिनांक २०/०४/२०२२ रोजी अकस्मात मृत्यू बाबतचा अहवाल. अमरावती शहर -

| अ. क्र. | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय वर्ष | स्त्री/ पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ०९ | १० |
| १ | बडनेरा | २८/२०२२ कलम १७४ जा. फौ. घटना ता. वेळ - दि. १८.०४.२२ चे १८.३० वा. दाखल ता. वेळ - दि | वारस | इर्विन दवाखाना, अमरावती./ घटनास्थळ - कवठा बहाळे, अम. | पंडित प्रल्हादराव रामटेके, वय ५० वर्षे, रा. खळणा, ता. नेर, जि. यवतमाळ | ५० | पुरूष | पो.हे.कॉं. सुखदेव राठोड, ब.न ९५, पो. स्टे. बडनेरा, अम. मो.नं. ८७८८८४०१२१ | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील मयत इसम नामे पंडित प्रल्हादराव रामटेके, वय ५० वर्षे, रा. खळणा, ता. नेर, जि. यवतमाळ हे फिर्यादी नामे अक्षय राजेंद्र रामटेके, वय २४ वर्षे रा. कवठा बहाळे, अम. याचे काका असुन मयत इसम हा फिर्यादीच्या बहीणीच्या लग्नाकरिता दि. १६.०४.२०२२ रोजी आले होते. मयत इसमास दारू पिण्याचे व्यसन होते. दि. १८.०४.२०२२ रोजी ते भरपुर दारू पिलेले होते. फिर्यादी व इतर पाहुणे हे रिसेप्शन करिता नांदगाव खंडेश्वर येथे गेले असता गावातील सरपंचाने फिर्यादीस माहीती दिली की, तुझ्या घरचा पाहुणा व्यक्ती तुझ्या घरासमोर पडलेला आहे. त्याची हालचाल होत नाही आहे. वरून फिर्यादी हे गावात आले असता पोलीसांच्या मदतीने फिर्यादीचे काकांना इर्विन दवाखाना, |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९.०४.२२ चे ००.२३ वा. | | | | | | | अमरावती येथे नेले असता डॉक्टरांनी तपासणी करून फिर्यादीच्या काकांना मृत घोषीत केले. अशा जबानी रिपोर्टवरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. विलंबाचे कारण - लागलीच. |